देशोन्नती
www.deshonnati.wardha
- वर्धा | गुरुवार | दि. ३० जानेवारी २०२५



- डॉ. मिलिंद कांबळे यांचे प्रतिपादन
- दिवाणी न्यायालय येथे मराठी भाषा पंधरवडा दिन साजरा

# बोलीभाषेचे संवर्धन करणे काळाची गरज

देशोन्नती वृत्तसंकलन

**समुद्रपूर :** भाषाही मानवाला मिळालेली बहुमूल्य देणगी आहे. भारत हा विविधतेने नटलेला देश असून, भारतात विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात त्याचे स्वरूप भिन्न आहे. उच्चारण, व्याकरण, शब्दसंग्रह दोन्ही व्यवस्थापन इत्यादी बाबतीत प्रत्येक भाषा आपले स्वतंत्र अस्तित्व जपत असते. मल्याळम, तेलुगु ,कन्नड, ओरिया ,बंगाली, गुजराती, पंजाबी ,सिंधी इत्यादी भाषा प्रमाणेच मराठी भाषा ही आपले वेगळेपण अंगभूत गुणवैशिष्ट्याने जपताना दिसते. मराठी भाषेत पुणेरी, कोल्हापुरी ,सातारी , वर्हाडी, खानदेशी, नागपुरी, अहिराणी ,डांगी, संगमेश्वरी, कोकणी अशा विविध बोलीभाषा बोलल्या जातात त्यांचे स्वरूप वेगवेगळे आहे.

प्रमाण भाषेपेक्षा बोलीभाषा स्वरूप पूर्णपणे भिन्न असून ती अधिक जिवंत आहे. म्हणून या बोलीभाषेचे संवर्धन करणे काळाची गरज आहे.. असे विचार डॉ. मिलिंद कांबळे यांनी व्यक्त केले. स्थानिक दिवाणी न्यायालय समुद्रपुर येथे मराठी भाषा पंधरवडा दिन साजरा करण्यात आला .

कार्यक्रमाचे अध्यक्ष दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश पी. एल .पाटील होते. प्रमुख वक्ते म्हणून विद्या विकास महाविद्यालयातील मराठी भाषा विषयाचे प्राध्यापक कादंबरीकार .कथाकार, समीक्षक डॉ. मिलिंद कांबळे मुख्य वक्ते म्हणून उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून सरकारी वकील ढोले . थुटे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. मिलिंद कांबळे यांनी मराठी भाषेला समृद्ध करण्यामध्ये बोलीभाषा तिचे कार्य किती महत्त्वाचे आहे या संदर्भात त्यांनी प्रकाश टाकला तसेच मराठी भाषा संवर्धन करण्यासाठी जास्तीत जास्त मराठी ग्रंथ वाचली पाहिजे. त्याचबरोबर पालकांनी आपल्या मुलांना मराठी शाळेमध्ये टाकले पाहिजे. वाचन संस्कृती वाढली पाहिजे यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकांनी पुढाकार घेतला पाहिजे.

आपल्या बोलीभाषेची माणसाला लाज वाटू नये या संदर्भात त्यांनी विचार व्यक्त केला. संत साहित्याने मराठी भाषेची कसे संवर्धन केले. यावरही त्यांनी प्रकाश टाकला . मराठी भाषा टिकण्यासाठी बोलीभाषा टिकल्या पाहिजे बोलीभाषा टिकल्या तरच मराठी प्रमाण भाषा टिकेल.

प्रमाण भाषा टिकली तर मराठी संस्कृती टिकेल ,मराठी संस्कृती टिकली तर पर्यायाने मराठी समाज टिकेल ,असे विचार डॉ. मिलिंद कांबळे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पी .एल .पाटील यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये मराठी भाषा संवर्धन संदर्भात बोलीचे महत्व, मराठी भाषेचे महत्व आणि वाचन संस्कृतीचे महत्त्व सांगितले. मराठी भाषा टिकवण्यासाठी आपण सगळ्यांनी पुढाकार घेतला पाहिजे तरच मराठी भाषा टिकेल यासाठी आपण जास्तीत जास्त मराठी मधून बोलले पाहिजे असाही विचार त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन विधीतज्ञ जामूनकर यांनी केले. आभार विधीतज्ञ गणवीर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इंगळे तसेच त्यांचे सहकारी यांनी प्रयत्न केले कार्यक्रमाला न्यायालयातील पक्षकार तसेच कर्मचारी व विधीतज्ञ उपस्थित होते. **तालुका प्रतिनिधी**

## वाचन संस्कृतीकरीता प्रत्येक सुजाण नागरिकांनी पुढाकार घ्यावा

मराठी भाषेला समृद्ध करण्यामध्ये बोलीभाषा तिचे कार्य किती महत्त्वाचे आहे या संदर्भात त्यांनी प्रकाश टाकला तसेच मराठी भाषा संवर्धन करण्यासाठी जास्तीत जास्त मराठी ग्रंथ वाचली पाहिजे. त्याचबरोबर पालकांनी आपल्या मुलांना मराठी शाळेमध्ये टाकले पाहिजे. वाचन संस्कृती वाढली पाहिजे यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकांनी पुढाकार घेतला पाहिजे. असे डॉ. मिलिंद कांबळे यांनी आवाहन केले.

AnyScanner

देशोन्नती

- वर्धा | गुरवार | दि. ३० जानेवारी २०२५

www.deshonnati.wardha@



- डॉ. मिलिंद कांबळे यांचे प्रतिपादन
- दिवाणी न्यायालय येथे मराठी भाषा पंधरवडा दिन साजरा

# बोलीभाषेचे संवर्धन करणे काळाची गरज

देशोन्नती वृत्तसंकलन

**समुद्रपूर :** भाषाही मानवाला मिळालेली बहुमूल्य देणगी आहे. भारत हा विविधतेने नटलेला देश असून, भारतात विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात त्याचे स्वरूप भिन्न आहे. उच्चारण, व्याकरण, शब्दसंग्रह दोन्ही व्यवस्थापन इत्यादी बाबतीत प्रत्येक भाषा आपले स्वतंत्र अस्तित्व जपत असते. मल्याळम, तेलुगु ,कन्नड, ओरिया ,बंगाली, गुजराती, पंजाबी ,सिंधी इत्यादी भाषा प्रमाणेच मराठी भाषा ही आपले वेगळेपण अंगभूत गुणवैशिष्ट्याने जपताना दिसते. मराठी भाषेत पुणेरी, कोल्हापुरी ,सातारी , वऱ्हाडी, खानदेशी, नागपुरी, अहिराणी ,डांगी, संगमेश्वरी, कोकणी अशा विविध बोलीभाषा बोलल्या जातात त्यांचे स्वरूप वेगवेगळे आहे.

प्रमाण भाषेपेक्षा बोलीभाषा स्वरूप पूर्णपणे भिन्न असून ती अधिक जिवंत आहे. म्हणून या बोलीभाषेचे संवर्धन करणे काळाची गरज आहे.. असे विचार डॉ. मिलिंद कांबळे यांनी व्यक्त केले. स्थानिक दिवाणी न्यायालय समुद्रपुर येथे मराठी भाषा पंधरवडा दिन साजरा करण्यात आला .

कार्यक्रमाचे अध्यक्ष दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश पी. एल .पाटील होते. प्रमुख वक्ते म्हणून विद्या विकास महाविद्यालयातील मराठी भाषा विषयाचे प्राध्यापक कादंबरीकार ,कथाकार, समीक्षक डॉ. मिलिंद कांबळे मुख्य वक्ते म्हणून उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून सरकारी वकील ढोले . थुटे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. मिलिंद कांबळे यांनी मराठी भाषेला समृद्ध करण्यामध्ये बोलीभाषा तिचे कार्य किती महत्त्वाचे आहे या संदर्भात त्यांनी प्रकाश टाकला तसेच मराठी भाषा संवर्धन करण्यासाठी जास्तीत जास्त मराठी ग्रंथ वाचली पाहिजे. त्याचबरोबर पालकांनी आपल्या मुलांना मराठी शाळेमध्ये टाकले पाहिजे. वाचन संस्कृती वाढली पाहिजे यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकांनी पुढाकार घेतला पाहिजे.

आपल्या बोलीभाषेची माणसाला लाज वाटू नये या संदर्भात त्यांनी विचार व्यक्त केला. संत साहित्याने मराठी भाषेची कसे संवर्धन केले. यावरही त्यांनी प्रकाश टाकला . मराठी भाषा टिकण्यासाठी बोलीभाषा टिकल्या पाहिजे बोलीभाषा टिकल्या तरच मराठी प्रमाण भाषा टिकेल.

प्रमाण भाषा टिकली तर मराठी संस्कृती टिकेल ,मराठी संस्कृती टिकली तर पर्यायाने मराठी समाज टिकेल ,असे विचार डॉ. मिलिंद कांबळे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पी .एल .पाटील यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये मराठी भाषा संवर्धन संदर्भात बोलीचे महत्व, मराठी भाषेचे महत्व आणि वाचन संस्कृतीचे महत्त्व सांगितले. मराठी भाषा टिकवण्यासाठी आपण सगळ्यांनी पुढाकार घेतला पाहिजे तरच मराठी भाषा टिकेल यासाठी आपण जास्तीत जास्त मराठी मधून बोलले पाहिजे असाही विचार त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन विधीतज्ञ जामूनकर यांनी केले. आभार विधीतज्ञ गणवीर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इंगळे तसेच त्यांचे सहकारी यांनी प्रयत्न केले कार्यक्रमाला न्यायालयातील पक्षकार तसेच कर्मचारी व विधीतज्ञ उपस्थित होते. **तालुका प्रतिनिधी**

## वाचन संस्कृतीकरीता प्रत्येक सुजाण नागरिकांनी पुढाकार घ्यावा

मराठी भाषेला समृद्ध करण्यामध्ये बोलीभाषा तिचे कार्य किती महत्त्वाचे आहे या संदर्भात त्यांनी प्रकाश टाकला तसेच मराठी भाषा संवर्धन करण्यासाठी जास्तीत जास्त मराठी ग्रंथ वाचली पाहिजे. त्याचबरोबर पालकांनी आपल्या मुलांना मराठी शाळेमध्ये टाकले पाहिजे. वाचन संस्कृती वाढली पाहिजे यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकांनी पुढाकार घेतला पाहिजे. असे डॉ. मिलिंद कांबळे यांनी आवाहन केले.

AnyScanner